**<u>ठळक बातम्या</u>**

- बांबू धोरणाला राज्य मंत्रीमंडळाची मान्यता, पीपल्स एज्युकेशन सोसायटीला ५०० कोटी रुपये देणार

- खड्ड्यांमुळे अपघाती मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबांना ६ लाख रुपये देण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे महानगरपालिकांना आदेश

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत VVPAT चा वापर करण्याची विरोधी पक्षांची मागणी

**आणि**

- जहाल नक्षलवादी भूपती उद्या गडचिरोलीत आत्मसमर्पण करणार

**<><><><>**

राज्य सरकारनं आगामी ५ वर्षांसाठीच्या बांबू धोरणाला आज मंजुरी दिली. यामुळं ५० हजार कोटींची गुंतवणूक आणि ५ लाख रोजगार निर्मितीची शक्यता आहे. राज्य मंत्रीमंडळाच्या निर्णयांविषयी सविस्तर जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड (१.१७ सेकंद)**

*(राष्ट्रीय बांबू मिशन आणि महाराष्ट्र मिशन २०२३ शी सुसंगत बांबू धोरणाला राज्य मंत्रीमंडळाची आज मंजुरी मिळाली. या धोरणात बांबू शेतकरी उत्पादक संघटना (FPO), कंत्राटी शेती आणि ऊर्जा, उद्योग आणि इतर घरगुती क्षेत्रांमध्ये बांबूच्या वापराला प्रोत्साहन दिलं जाणार आहे. राज्यभरात १५ बांबू क्लस्टर्स स्थापन केले जाणार असून दुर्गम भागातल्या बांबू कारागीरांसाठी सुविधा केंद्रे सुरू केली जातील. बांबूशी निगडीत प्रक्रिया उद्योगांना व्याज अनुदान, वीज अनुदान तसेच मुद्रांक शुल्क आणि वीज शुल्क सवलती दिल्या जातील. याशिवाय विविध वित्तीय संस्थांकडून भांडवल पुरवण्यासाठी मदत केली जाईल. हे धोरण राबवण्यासाठी १ हजार ५३४ कोटी रुपयांच्या तरतुदी मंत्रीमंडळानं मंजूर केल्या. द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विविध शैक्षणिक संस्था, वसतिगृहांच्या इमारतींचा जीर्णोद्धार, जतन आणि संवर्धन करण्याकरिता स्वतंत्र योजना राबवायलाही आज मंत्रिमंडळानं मान्यता दिली. या योजनेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या नऊ शैक्षणिक संस्था आणि दोन वसतिगृहांचे जतन आणि संवर्धन केले जाणार आहे. यासाठी पुढील पाच वर्षात, दरवर्षी १०० कोटी*

*यप्रमाणे ५०० कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाकरिता नव्याने २ हजार २२८ पदांची निर्मिती करायलाही मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली. )*

**<><><><><>**

मुंबईत माता रमाबाई नगर आणि कामराज नगर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचं भूमिपूजन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. गेल्या ४० वर्षांपासून इथले लोक कठीण परिस्थितीत जगत आहेत, त्यांचा खडतर प्रवास आज संपला असून, या १७ हजार कुटुंबांचं घरांचं स्वप्न महायुती सरकार पूर्णत्वाला नेईल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं. इथं कोणताही खाजगी बिल्डर नाही, एमएमआरडीएच हा प्रकल्प राबवत आहे. त्यामुळे दर्जेदार घरं वेळेत मिळतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या समूह पुनर्विकास योजनेत माता रमाबाई आंबेडकरांचं स्मारक उभारण्याची घोषणा शिंदे यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

पात्र गावांना वनहक्क देण्यासंदर्भात आदिवासी विकास आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मुंबई इथं मंत्रालयात वनहक्क कायदा २००६ च्या अंमलबजावणीसंदर्भात अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. आदिवासी वनपट्टेधारकांना सातबाऱ्या प्रमाणे पीक कर्ज द्यावं, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना, वारसा हक्क आदी योजनांचा लाभ मिळवून द्यावा, वनपट्टा मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसांनाही लाभ मिळावा, वनपट्टेधारकांच्या पिकांचं नुकसान झाल्यास त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, यासाठी शासन निर्णयात योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात, असं अजित पवार यांनी सांगितलं. जंगल नसलेल्या परंतु ५० टक्क्यापेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्येच्या गावांचाही 'पेसा'मध्ये समावेश करावा, तसंच प्रधानमंत्री आवास

योजनेची सर्व महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी या बैठकीत दिले.

**<><><><><>**

राज्यात रस्त्यावरच्या खड्ड्यांमुळे अपघात होऊन मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना ६ लाख रुपये नुकसानभरपाई द्यायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आज संबंधित महानगरपालिकांना दिले. तसंच, अशा दुर्घटनांमध्ये जखमी झालेल्यांना ५० हजार ते अडीच लाख रुपयांपर्यंत नुकसानभरपाई द्यावी, असंही न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या पीठानं सांगितलं. चांगले आणि सुरक्षित रस्ते हा राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत नागरिकांच्या जगण्याच्या हक्काचा भाग आहे, याचा पुनरुच्चारही पीठानं केला.

**<><><><><>**

कॉम्रेड गोविंद पानसरे हत्याप्रकरणातले मुख्य आरोपी, वीरेंद्र तावडे, शरद कळसकर आणि अमोल काळे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचनं आज जामीन मंजूर केला. या प्रकरणात एकूण १२ संशयित असून मुंबई उच्च न्यायालयाकडून कॉ. पानसरे हत्या प्रकरणी सचिन अंदुरे, गणेश मिस्कीन, अमित डेगवेकर, भरत कुरणे, अमित बद्दी, समीर गायकवाड आणि वासुदेव सूर्यवंशी यांना यापूर्वीच जामीन मिळाला आहे.

**<><><><><>**

मतदार यादीतल्या त्रुटी दूर कराव्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत VVPAT वापरावं, जुलै २०२५ नंतर वयाची १८ वर्ष पूर्ण केलेल्यांना मतदार यादीत समाविष्ट करुन घ्यावं अशा मागण्या आज विरोधी पक्षांच्या नेत्यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांच्याकडे केल्या. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात,

मुंबई कॉंग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड, शेकापचे जयंत पाटील, समाजवादी पक्षाचे रईस शेख, यांच्यासह महाविकास आघाडीतल्या सहयोगी पक्षांचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

मतदार यादीत नव्यानं नावं समाविष्ट करणं, अथवा वगळणं किंवा अन्य बदल करण्याचा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नसल्याचं राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज स्पष्ट केलं. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आज मुंबईत बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><>**

भारतातून अमेरिकेला जाणारी  टपाल सेवा उद्यापासून पुन्हा सुरु होणार आहे. अमेरिकेच्या आयात शुल्क धोरणांच्या अंमलबजावणीनंतर २२ ऑगस्ट २०२५ पासून ही सेवा स्थगित करण्यात आली होती. नवीन रचनेनुसार भारतातून टपालाने अमेरिकेत पाठवण्याच्या पार्सलवर भारतातच शुल्क वसुली होईल. अमेरिकेत प्रवेश करताना त्यावर पुन्हा उत्पादननिहाय शुल्क आकारलं जाणार नाही.

**<><><><>**

नक्षलवाद्यांच्या पॉलिट ब्युरोचा सदस्य असलेल्या भूपती उर्फ मल्लोजुला वेणुगोपाल उद्या गडचिरोली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण करणार असल्याचं वृत्त आहे. त्याच्यावर विविध राज्यात १० कोटी रुपयांचं बक्षीस आहे. त्याच्यासोबत ६० नक्षलवादी सुद्धा आत्मसमर्पण करतील. यामुळं नक्षल चळवळीला मोठा हादरा बसल्याची चर्चा आहे. पोलिसांनी मात्र या आत्मसमर्पणाच्या वृत्ताला दुजोरा दिलेला नाही. काही दिवसांपूर्वी ‘शस्त्र उचलणं ही चूक होती, ‘जनतेची माफी मागून शांततेचा मार्ग स्विकारणं गरजेचं आहे’ या

आशयाचं पत्र भूपतीनं लिहिलं होतं. इतर नक्षलवादी नेत्यांनी या भूमिकेला विरोध केला होता.

**<><><><>**

महाबोधी महाविहार मुक्तीसाठी सर्वपक्षीय बौद्ध नेत्यांनी आज मुंबईत मोर्चा काढला. बी टी ॲक्ट रद्द करून महाबोधी महाविहारचे व्यवस्थापन बौद्धांच्या हाती द्यावे अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आझाद मैदानावर झालेल्या सभेत केली. यावेळी जोगेंद्र कवाडे, वर्षा गायकवाड़, चंद्रकांत हंडोरे, सुलेखा कुंभारे यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

**<><><><>**

गाव, वस्ती आणि रस्त्यांची जातीवाचक नावं बदलून त्यांना महामानवांची नावं देण्याचा निर्णय सामाजिक न्याय आणि विशेष विभागानं घेतला होता. त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यांतल्या १९२ वस्त्यांसह २५ रस्त्यांना महामानवांची नावं देण्यात आली आहेत. ग्रामसभेच्या ठरावानुसार प्राप्त झालेले प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर करून जुनी जातीवाचक नावं बदलून नवीन प्रस्तावित नावांना अधिकृत मान्यता दिली आहे.

**<><><><>**

जालना जिल्ह्यात जाफ्राबाद तालुक्यातल्या वाढोणा तांडा इथं आज दुपारी दोन शाळकरी मुलांचा पाझर तलावात बुडून मृत्यू झाला. ही मुलं तलावात पोहण्यासाठी उतरली होती. मात्र त्यांना पाण्याच्या खोलीचा अंदाज आला नाही. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

**<><><><>**

भारतीय सागरी क्षेत्राच्या विकासासाठी इंडिया मेरीटाइम विक २०२५ या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारनं मुंबईत कायमचं केंद्र उभारावं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. मंत्रालयात आज झालेल्या बैठकीत त्यांनी इंडिया

मेरीटाईम विकच्या आयोजनाचा आढावा घेतला. केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवालही यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

अतिवृष्टीग्रस्त विद्यार्थ्यांचं संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करावं या मागणीसाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया, डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया आणि जनवादी महिला संघटनेनं आज बीड जिल्ह्यातल्या माजलगाव इथं आंदोलन केलं. या आंदोलनात विद्यार्थी आणि तरुण मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेच्या पोर्टलचं उद्घाटन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मंत्रालयात झालं.

<><><><><>

सिंधुदुर्गातल्या समुद्र किनाऱ्यांवर एआय-आधारित सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहेत. देवगड, मालवण आणि वेंगुर्ले यांसारख्या सागरी हद्दीतल्या समुद्रकिनाऱ्यांवर हे सीसीटीव्ही कॅमेरे लावणार असल्याचं पालकमंत्री नितेश राणे यांनी सांगितलं.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//